# ग्रामपंचायत :- चांदवड,
# तालुका :- चांदवड,
# जिल्हा :- नाशिक

# संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना लेखापरीक्षण अहवाल

## सन २००५ – २००६
## ते
## २००७ – २००८

# ग्रामपंचायत :- चांदवड, तालुका :- चांदवड, जिल्हा :- नाशिक
# संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना लेखापरीक्षण अहवाल
## सन २००५ – २००६ ते २००७ – २००८

जा.क्र.एल ४ बी/१/ग्राम/लेखा/नाशिक

उपमुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा, नाशिक
लेखाकोष भवन, तिसरा मजला,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार,
नाशिक
दिनांक :-

प्रति,
मा. सरपंच,
ग्रामपंचायत : चांदवड
तालुका : चांदवड
जिल्हा : नाशिक

महोदय,

ग्रामपंचायत - चांदवड, तालुका - चांदवड, जिल्हा - नाशिक येथील संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेचे सन २००५ - २००६ ते २००७ - २००८ या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण श्री. शे. गो. देवळे, जिल्हा ग्रामपंचायत लेखापरीक्षक श्रेणी - २, स्थानिक निधी लेखा, नाशिक यांनी श्री. भा. मा. सोनवणे, ग्रामपंचायत दुय्यम लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक यांचे मदतीने दिनांक २३.४.२००८ ते १७.६.२००८ च्या कालावधीत पंचायतीचे ग्रामसेवक श्री. एस. पी. उबाळे यांनी उपलब्ध केलेल्या दप्तरावरुन पूर्ण केले. त्यात निघालेले आक्षेप भाग - २ मध्ये दिलेले आहेत. त्याची पुर्तता पंचायतीचे मुंबई अधिनियम १९५८ चे कलम १४०(२)(३) प्रमाणे तीन महिन्यात करावी, या अहवालावर सरपंच / ग्रामसेवक यांचेशी चर्चा करुन अंतिमीकरण केले.

अहवाल वर्षात खालील पदाधिकारी पंचायतीचा कारभार पहात होते.

| अ. क्र. | पदनाम | अ. क्र. | नाव | कालावधी | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | पासून | पर्यंत |
| १ | सरपंच | १ | श्री. जगन्नाथ निवृत्ती राऊत | ०१.०४.२००५ | २१.०८.२००५ |
| | | २ | श्री. सुनिल त्र्यंबक कबाडे | २२.०८.२००५ | ११.०९.२००७ |
| | | ३ | सौ. शांताबाई हिरामण शेळके | १२.०९.२००७ | १२.१२.२००७ |
| | | ४ | श्री. राजेंद्र ताराचंदजी डुंगरवाल | १३.१२.२००७ | ३१.०३.२००८ |
| २ | ग्रामविकास अधिकारी | १ | श्री. डी. एन. जगताप | ०१.०४.२००३ | ३०.१०.२००७ |
| | | २ | श्री. एस. पी. उबाळे | ०१.११.२००७ | ३१.०३.२००८ |

## परिच्छेद क्रमांक :- १ :- भाग पहिला (मागील लेख्रा परीक्षण)

महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखापरीक्ष्ज्ञण १९६१ चे नियम १८(१)(२) प्रमाणे पंचायतीचे मागील लेखापरीक्षण सन २००४ - २००५ अखेर झालेले आहे. मात्र आजतागायत खालील दर्शविलेले परिच्छेद प्रलंबित असून त्याची पुर्तता करुन त्यावर महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे नियम १४०(३)(४) नुसार योग्य ती कार्यवाही करावी व अंतिम निर्णय प्राप्त करुन दाखवावेत. तो पावेतो खालील नमुद सर्व परिच्छेद कायम समजण्यात येत आहेत.

---

## परिच्छेद क्रमांक :- २ :- जरोयो / जग्रासयो / संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना लेख्रा परीक्षण अहवालाबाबत.

जग्रासयो नियम पुस्तिका प्रकरण २ मधील ८ (५) अन्वये पंचायतीने जरोयोच्या परिच्छेदांची पुर्तता करुन त्यावर मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे नियम १४०(३)(४) केलेल्या परिच्छेदांची पुर्तता केलेली नाही. त्या अभावी खालील नमुद केलेले परिच्छेद लेखापरीक्षणात कायम समजण्या येत आहे.

| लेखापरीक्षण वर्ष | पुर्तता पात्र परिच्छेद | पुर्तता केलेले परिच्छेद | स्विकृत परिच्छेद | थकीत परिच्छेद |
|---|---|---|---|---|
| ८९-९० ते ९२-९३ | २४ | - | - | २४ |
| ९३-९४ ते ९९-०० | १९ | - | - | १९ |
| ००-०१ ते ०२-०३ | २६ | - | - | २६ |
| ०३-०४ | १५ | - | - | १५ |
| ०४-०५ | २५ | - | - | २५ |

---

# भाग २ रा
# चालु लेखापरीक्षण

महाराष्ट्र ग्रामपंचायत (लेखापरीक्षा) नियम १९६१ चे नियम १६ प्रमाणे लेखापरीक्षणाचे दिवशी दिनांक २३.४.२००८ रोजी पंचायतीच्या संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेच्या शिल्लक व कोरी पावती पुस्तके यांचा हिशोब तपासला असता तो खालीलप्रमाणे आढळून आला.

| | तपशिल | रुपये |
|---|---|---|
| अ | बँकेत एन. डी. सी. सी. शाखा चांदवड | ६३.५१ |
| ब | बँकेत महाराष्ट्र बँक | ४४६१.०० |
| क | पोष्टात रुपये | - |
| ड | रोख रुपये | - |
| इ | धान्य (नमुना नंबर १८ वरुन) | - |
| | **एकूण -** | **४५२४.५१** |

महाराष्ट्र ग्रामपंचायत (लेखापरीक्षा) नियम १९६१ चे नियम १८(२)(ब) प्रमाणे

---

## परिच्छेद क्रमांक :- ४ :- आर्थिक स्थिती

दिनांक ३१ मार्च २००८ ची संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेची आर्थिक स्थिती दर्शविणारे विवरणपत्र पुढीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | परि. क्र. | दायित्व | रुपये | अ. क्र. | परि. क्र. | मत्ता | रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | अनामत परत करणे | - | १ | | बँकेत एन. डी. सी. सी. शाखा चांदवड | ६३.५१ |
| २ | | रॉयल्टी गटार कामा संदर्भात भरणा करणे | ४,३३२.०० | | | बँकेत महाराष्ट्र बँक | ४३८४.०० |
| | | | | | | पोष्टात रुपये | - |
| | | | | | | रोख रुपये | - |
| | | | | | | धान्य (नमुना नंबर १८ वरुन) | - |
| | | | | | | **एकूण -** | **४४४७.५१** |
| | | **एकूण एकंदर** | ४,३३२.०० | | | **एकूण एकंदर** | ४४४७.५१ |

**प्रस्तावना :-**

१. १० व्या पंचवार्षिक योजनेच्या दिशादर्शक मसूद्यांमध्ये केंद्र शासनाने द्रारिद्रय निर्मुलनाचा एक महत्त्वाचा भाग म्हणून संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना दर्शविलेली आहे. त्यानुसार दिनांक १५ ऑगस्ट २००१ रोजी राष्ट्राला उद्देशून केलेल्या भाषणात मा. पंतप्रधान महोदयांनी धान्याशी निगडीत अशी नवीन रोजगार योजना संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना जाहिर केली. त्या अनुषंगाने केंद्र शासनाने आश्वासित रोजगार योजना व जवाहर ग्राम समृध्दी योजना समाविष्ट करुन संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना दिनांक २५.९.२००१ पासून देशात लागू केलेली आहे.

२. हा कार्यक्रम स्वयं उद्दिष्ट प्रणालीचा आहे. महाराष्ट्रातील रोजगार हमी योजनेच्या धर्तीवर या कार्यक्रमांची रचना व कार्यपध्दती आखण्यात आलेली आहे. या कार्यक्रमाखाली रोजगाराचा भाग म्हणून मजूरांना अन्नधान्य वाटप करण्यात येणार आहे. थोडक्यात रोजगार व अन्नधान्य यांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील कुटूंबांना सामाजिक सुरक्षितता देणे या माध्यमातून ग्रामीण भागात जलसंवर्धन / पाणलोट विकास रस्ते व छोटी बांधकामे विकसित करणे हा या कार्यक्रमांचा प्रमुख उद्देश आहे.

३. राज्यांमध्ये या पूर्वीच्या केंद्र शासनाच्या रोजगार कार्यक्रमांपेक्षा हा अतिशय वेगळया प्रकारचा कार्यक्रम आहे. ही बाब नियोजनामध्ये केंद्र स्थानी ठेवणे अत्यावश्यक आहे. या कार्यक्रमाखाली कोणत्याही प्रकारची कंत्राटी पध्दतीची कामे घेता येणार नाहीत. किंबहुना अशाप्रकारची कामे घेण्यात येऊ नयेत, अशी केंद्र शासनाची स्पष्ट भूमिका आहे. या कार्यक्रमाखाली मजूरांना धान्य वाटप सक्तीचे राहणार आहे. धान्य न वाटल्यास तितकाच निधी त्या राज्याच्या / जिल्हयाचा कमी होणार आहे. थोडक्यात धान्य वाटप हा या कार्यक्रमाचा अनिवार्य भाग राहील. धान्य वाटपातील हजेरीपट ठेवणे धान्य वाटपासाठी मजूरांना कुपने देणे हे अंमलबजावणी करणा-या यंत्रणेवर सक्तीचे राहील.

**योजनेची उद्दीष्टे**

या कार्यक्रमाखाली रोजगाराचा भाग म्हणून मजूरांना अन्नधान्य वाटप करावयाचे आहे. थोडक्यात रोजगार व अन्नधान्य यांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील कुटूंबांना सामाजिक सुरक्षितता देणे व या मनुष्य बळाच्या माध्यमातून ग्रामीण भागात जलसंवर्धन / पाणलोट विकास, रस्ते व छोटी बांधकाम विकसित करणे हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे.

---

**परिच्छेद क्रमांक :- ५ :- अभिलेखे उपलब्ध न केल्याबाबत.**

ह्या कार्यालयाचे पत्र क्रमांक ५६३ दिनांक ७.३.२००८ ने सन २००५ - २००६ ते २००७ - २००८ चे लेखापरीक्षणाबाबत सूचित केलेले आहे. संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेचे सन २००५ - २००६ ते दिनांक २७.१०.२००७ पावेतोचे रोखवही, प्रमाणके, मोजमाप पुस्तके, धान्य वितरण नोंदवही इत्यादी लेखे वारंवार तोंडी सूचना व अर्धसमास पत्र क्रमांक ५/ दिनांक १७.६.२००८ रोजी देऊनही उपलब्ध केले नाही.

ह्या लेख्यासंदर्भात संबंधितांनी अर्धसमास पत्राद्वारे कागदपत्रे, लेखे कार्यभार हस्तांतरणांत ग्रामपंचायतीस सादर केले नाही. त्यामुळे लेखे लेखापरीक्षणांत सादर करता येत नाही असे कळविले आहे. याबाबत मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम १७९ नुसार आवश्यक कार्यवाहीसाठी मा. जिल्हाधिकारी यांचेकडे प्रस्ताव सादर होणे आवश्यक आहे.

ह्या उपरोक्त कालावधीचे बँक ऑफ महाराष्ट्रचे खाते क्रमांक ५३३५ ची छायांकीत प्रत प्राप्त झाली असून दिनांक १.४.२००५ ते २७.१०.२००७ ह्या कालावधीत सोबत जोडलेल्या विवरणपत्रानुसार अनुक्रमे रुपये ८,५०,१३१/-, ७,४३.,३२०/-, ३,७९,२७२/- एवढे अनुदान प्राप्त झाले असून ह्या जमा रक्कमेवर बँकेने व्याज रुपये १,७२४/- जमा आहे.

दरम्यान संबंधितांनी ह्या योजनेच्या बँक ऑफ महाराष्ट्र खातेमधून अनुक्रमे रुपये ७,०५,६७२/-, ९,१५,०००/- व ३,८०,९७३/- एकूण रुपये २०,०१,६०५/- खर्च झालेला आहे. (सोबत ह्या कालावधीचा जमा व खर्च तक्ता जोडला आहे)

रुपये २०,०१,६४५/- खर्चाबाबत लेखे उपलब्ध नसल्याने लेखापरीक्षण दरम्यान कोणत्या कामांवर खर्च केला व तो योग्य अचूक असलेबाबत खात्री करता आली नाही, ह्या व्यवसायाबाबत प्रशासकीय चौकशी होऊन खर्चाबाबत खात्री पटवावी व ह्यात काही गैरव्यवहार झाला असेल तर त्याबाबत योग्य ती कार्यवाही करुन रक्कमा वसूल करणेत यावा.

---

**परिच्छेद क्रमांक :- ६ :- धान्य कुपनाबाबत.**

सन २००४ - २००५ ह्या वर्षाअखेर मागील लेखापरीक्षण अहवालानुसार गहू ५१ क्विंटल शिल्लक दाखवला असून पुढील लेखे उपलब्ध न झालेने ह्याशिल्लक धान्याचा व लेखापरीक्षण वर्षात प्राप्त धान्याचा विनियोग योग्य झाला किंवा कसे ह्याची सत्यता पडताळता आली नाही.

---

**परिच्छेद क्रमांक :- ७ :- अनुदानाबाबत.**

अ) सदर योजनेअंतर्गत लोकसंख्योच्या परिमाणानुसार पंचायतीला किती अनुदान अनुज्ञेय होते. याबाबत कोणतेही कागदपत्र उपलब्ध नाहीत. त्यामुळे मंजूर अनुदानाबाबत समजून येत नाही. पंचायतीने याबाबत कागदपत्र उपलब्ध करुन अनुदानाची खात्री पटवावी. मंजूर अनुदानापेक्षा पंचायतीला कमी अनुदान मिळाले असल्यास उर्वरित अनुदानाची पंचायत समितीकडे मागणी करुन प्राप्त करुन दाखवावे. लेखापरीक्षण वर्षात पंचायतीला मिळालेल्या अनुदानाचे दाखले उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे कोणत्या कामासाठी किती अनुदान मिळाले याबाबत खात्री करता आली नाही. तरी दाखले उपलबध करुन खात्री पटवावी. मिळालेल्या अनुदानापेक्ज्ञा जादा खर्च असल्यास उर्वरित अनुदान मिळवून दाखवावे व कमी खर्च असल्यास अनुदान परत करण्यात यावे. अहवालात घेण्यात आलेल्या अनुदानाच्या रक्कमांचा तपशील नमुना नंबर ५ रोकडवहीवरुन घेण्यात आला असून, त्याप्रमाणे त्या रक्कमा गृहीत धरुन अहवाल तयार केला असे प्रत्यक्ष दाखला उपलब्ध करुन रोकडवहीत नमुद तपशीलाची खात्री पटवावी.

अहवाल वर्षात पंचायतीला मिळालेल्या अनुदान रक्कमांचा तपशील या अहवालासोबत विवरण पत्र क्रमांक १ मध्ये नमुद केलेला आहे.

ब) या शिवाय पंचायतीतील देखभाल खर्चासाठी वेगळे अनुदान प्राप्त झालेले आहे / नाही. अहवाल वर्षात प्राप्त झालेल्या अनुदानातून पंचायतीने केलेल्या बांधकामाचा तपशील या अहवालासोबत नमुना ग मध्ये दिलेला आहे. संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना संहितेतील प्रकरण ५ मधील नियम १६.५ मधील तरतुदीस तसेच ग्रामसभेच्या अनुमतीस अधिन राहून ग्रामपंचायतीने खालील कामे प्रस्थावित केली आहेत.

**प्रस्तावित कामांचा तपशिल**

| अ.क्र. | वर्षे | कामांचा तपशिल |
|---|---|---|
| १ | ०५-०६ ते ३१.१२.२००७ | लेखे उपलब्ध नाही |
| | ०७-०८ | गटार बांधकाम |

या योजनेतून झालेल्या खर्चाचे व अनुषंगीक लेख्यांचे लेखापरीक्षण केले असता त्यामध्ये खालीलप्रमाणे अनियमितता आढळून आल्यात.

**परिच्छेद क्रमांक :- ८ :- विकास कामांबाबत**

ग्रामपंचायतीने पूर्ण केलेल्या बांधकामातील अनियमिततेबाबत

अहवाल वर्षात केलेल्या कामाचा तपशील या अहवालासोबत नमुना ग मध्ये दिलेला आहे. त्याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१. काम क्रमांक १ चे प्रशासकीय आदेश पहावयास मिळाले नाहीत.

२. मोजमाप पुस्तिका क्रमांक २६६४५२ रक्कम अदा करते वेळी केलेल्या कामाचा संक्षिप्त गोषवारा काढून त्याखली सक्षम तांत्रिक अधिकारी (अभियंता) यांनी (उपअभियंता) यांनी (पास फॉर पेमेंट) प्रदानासाठी पारीत असा दाखला नमुद करणे अत्यावश्यक आहे. परंतु आदेशाचे पालन झालेले नाहीत तसेच रक्कम प्रदान केलेनंतर नोंदीवर लाल शाईने क्रॉस (X) करावयास पाहिजे. परंतु कार्यवाही अंमलात आणलेली नाही.

३. कामावर वापरलेल्या साहित्याबाबत कनिष्ठ अभियंता यांनी मोजमाप पुस्तिकात नोंदविलेल्या मापानुसार वेळोवेळी वा एकत्र असा साहित्य वापर तक्ता (कंझमशन स्टेटमेंट) तयार केलेले नाही. तसेच साहित्य खरेदी योग्य परिमाणापेक्षा जादा खरेदी केल्याची शक्यता नाकारता येत नाही. कंझमशन स्टेटमेंट प्राप्त करुन दाखवावे.

४. पंचायतीने बांधकामासाठी सिमेंट गोण्या खरेदी केलेल्या आहेत. परंतु रिकाम्या गोण्यांची अद्याप विक्री केलेली दिसून येत नाही तरी आता विक्री रक्कम संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेत खाती भरण्यात यावी.

वरील सर्व बाबींचा खुलासा करणेत येऊन झालेल्या खर्चाची सत्यता, योग्यता व अचूकतेची खात्री पटवावी. तो पावेतो नमुना ग प्रमाणे काम क्रमांक १ ते - वर झालेला खर्च रक्कम रुपये २,६६,४५२/- लेखापरीक्षणात आक्षेपाधिन ठेवणेत येत आहे.

---

**परिच्छेद क्रमांक :- ९ :- निर्माण केलेल्या मत्त्यांचे अभिलेख्यांबाबत.**

संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना मार्गदर्शन पुस्तिका प्रकरण ५ मधील नियम १६.३ अंतर्गत कार्यक्रमांतर्गत निर्माण करण्यात आलेली मत्तांची नोंदवही तपासणीच्यावेळी उपलब्ध झाली नाही तरी यापुढे नोंदवही अद्यावत ठेवण्यात यावी. नोंदवहीत प्रकल्प सुरु केल्याचा आणि पूर्ण केल्याचा दिनांक, झालेला खर्च, मिळालेला लाभ निर्माण केलेला रोजगार आणि इतर संबंधित बाबी यांचा अंतर्भाव असावा. तसेच वरीलप्रमाणे माहिती

दश्रविणारे फलक तयार करुन कामाच्या ठिकाणी लावण्यात यावे कामास प्रारंभ करण्यापूर्वीचे काम चालु असतांनाचे आणि काम पूर्ण झाल्यानंतरचे अशा प्रकारच्या छायाचित्रांच्या स्वरुपात कामाच्या कार्यान्वियनातील विविध टप्प्यांचा अभिलेख ठेवण्यात यावे.

---

**परिच्छेद क्रमांक :- १० :- सामाजिक लेखापरीक्षाबाबत**

संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना मार्गदर्शन पुस्तिका प्रकरण ५ मधील नियम क्रमांक १६.५ नुसारच्या सुचनेनुसार संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनाचे सामाजिक नियंत्रण व्हावे म्हणून संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेचे नियोजन, अंमलबजावणी, संनियंत्रण आणि पर्यवेक्षण या संबंधात विचार विनिमय करण्यासाठी दर तीन महिन्यांनी ठराविक दिवशी, वेळी आणि ठिकाणी ग्रामसभेच्या बैठकीत आयोजित करणे आवश्यक होते. ग्रामसभेत योजनेची प्रगती इतर सर्व संबंधित बाबींची माहिती ग्रामसभेला देण्यात आली पाहिजे. परंतु दर तीन महिन्यात ग्रामसभेचे इतिवृत्त तपासणीच्या वेळी उपलब्ध झाले नाही तरी वरील सुचनांचे पालन करण्यात यावे.

---

**परिच्छेद क्रमांक :- ११ :- अनुसुचित जाती / जमाती यांच्याकरीता लाभार्थीभिमुख स्वतंत्र कार्यक्रमांबाबत.**

संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेतील नियम पुस्तिका प्रकरण १ नियम क्र. १.५ (खख) नुसार अनुसुचित जाती / जमाती यांच्याकरीता लाभार्थीभिमुख स्वतंत्र कार्यक्रम राबविणे आवश्यक असून, पंचायतीस मिळालेल्या रक्कमेच्या ५०% इतकी रक्कम अनुसुचित जाती / जमाती यांच्यासाठी स्वतंत्र कामे करण्याकरिता वापरण्यात यावी असे नमुद असतांना खालीलप्रमाणे कमी खर्च का करण्यात आला चा खुलासा करावा. कमी खर्च केल्यामुहे संपूर्ण ग्रामीण रोजगार मार्गदर्शक तत्वे पुस्तिकेत नमुद केल्याप्रमाणे प्रमाणित वजावट झाल्यास खर्चाचा रक्कम रुपये १,२८,३७०/- अनुशेष पंचायतीने भरुन काढावा. तसेच जादा झालेल्या खर्चाचा रक्कम रुपये पुढील वर्षात समायोजन करण्यात यावे.

| वर्षे | मिळालेले अनुदान | ५०% प्रमाणे करावयाचा खर्च | केलेला खर्च | कमी खर्च | जादा खर्च |
|---|---|---|---|---|---|
| २००७ - २००८ | २,५६,७४० | १,२८,३७० | - | १,२८,३७० | - |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

**परिच्छेद क्रमांक :- १२ :- धनादेशाने रक्कमा प्रदान करणेबाबत**

मुंबई ग्रामपंचायत अंदाजपत्रकात व हिशोब १९५८ चे नियम ५ (अ) प्रमाणे रक्कम रुपये ५००/- च्या वरील रक्कमा धनादेशाने प्रदान करावयाच्या आहेत. तथापि लेखापरीक्षण कालावधीत बहुतांशी रक्कमा रोख अदा केलेल्या आहेत तरी नियमाविरुध्द रोख रक्कमा का अदा केला खचा खुलासा संबंधितांनी करावा व यापुढे नियमाप्रमाणे धनादेशाद्वारे रक्कमा प्रदान करण्यात याव्यात.

---

**परिच्छेद क्रमांक :- १३ :- पूर्व मंजूरीशिवाय काढलेले धनादेश**

संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना मार्गदर्शन पुस्तिका नियम प्रकरण क्र. ५ नियम १४.३ अन्वये ग्रामपंचायतीची पूर्व मंजूरी तसेच सरपंच, सचिव व २/३ सदस्य गठन केलेल्या बांधकाम समितीची पूर्व मंजूरी घ्यावयाची आहे. नंतर नेहमीच्या मासिक सभेत या खर्चाला मंजूरी द्यावयाची आहे. परंतु या नियमांचे पालन झालेले दिसून येत नाही.

---

**परिच्छेद क्रमांक :- १४ :- कार्यदिनाचे निर्मितीबाबत**

ग्रामीण भागात स्थानिक पातळीवर अधिकाधिक रोजगार निर्माण व्हावा या उद्देशाने संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेअंतर्गत घेतलेल्या प्रत्येक कामाचे प्राकलनावर किती कार्यदिनाचे काम उपलब्ध होईल हे सक्षम तांत्रिक अधिकारी यांनी नमुद करणे आवश्यक असतांना तसे केलेले नाही. कार्यदिनाचे तपशीलाअभावी रोजगार निर्मितीचे उद्दीष्ट कितपत साध्य झाले याची पडताळणी करता आली नाही. त्यामुळे अहवालासोबत जोडलेल्या नमुना ग मधील स्तंभ क्र. १४ मध्ये अपेक्षित मानवी दिवस नमुद करता आलेले नाहीत.

---

**परिच्छेद क्रमांक :- १५ :- नमुना नंबर ६ जमाखर्चाचे वर्गीकरण नोंदवहीबाबत.**

लेखापरीक्षण कालावधीत नमुना नंबर ६ - जमाखर्चाचे वर्गीकरण नोंदवही पहाता वर्गीकरण नोंदवही वर्ष निहाय ठेवलेली नाही. मार्च अखेरचा खर्च कामनिहाय मंजूरी व साहित्य याचा तपशील स्वतंत्र दाखविलेला नाही. सिमेंट, विटा, दगड, वाळू

इत्यादी खरेदीचा खर्च ज्या प्रमाणानुसार साहित्य कामावर वापरले त्या प्रमाणात सदरचा खर्च त्या कामावर नोंदणे आवश्यक आहे. परंतु तसे केलेले नाही. वर्षाच्या शेवटी ताळमेळ घेतलेला नाही. एकंदरीत जमा खर्च वर्गीकरण नोंदवही अपूर्ण असून ती अचूक लिहीलेली नसल्याने काम निहाय झालेला खर्च काढता येत नाही. तो लेखापरीक्षण चालु असतांना कच्च्या स्वरुपात तयार करुन घेतलेला आहे व त्याआधारे लेखापरीक्षण अहवाल तयार केलेला आहे. जमा खर्च वर्गीकरण नोंदवहीबाबत सचिव यांनी दुर्लक्ष केलेले आहे. यापुढे नमुना नंबर ६ - जमा खर्च वर्गीकरण नोंदवही अद्यावत लिहिण्याची दक्षता घ्यावी.

---

**परिच्छेद क्रमांक :- १६ :- साहित्य विनियोग प्रमाणपत्राबाबत**

ग्रामपंचायतीने सदर योजनेतंर्गत केलेल्या कामाची मोजमापे तांत्रिक अधिकारी यांनी नमुना नंबर २३ वर नोंदविली आहेच. परंतु सिमेंट, लोखंड, लाकुड, दगड, वाळू इत्यादी साहित्याचा सदर कामावर किती वापर केला यांचे विनियोग दाखले न नोंदविल्याने खरेदी केलेले साहित्य व विनियोग यांचा मेळ घेता आला नाही. तरी याबाबत खुलासा करावा व साहित्य विनियोगाचे संबंधित तांत्रिक अधिका-यांचे विनियोग दाखले घेऊन खरेदी साहित्यांचा मेळ घेऊन उर्वरित साहित्यांचा काय विनियोग केला याचा खुलासा करावा.

---

**परिच्छेद क्रमांक :- १७ :- कार्यान्वित अभिकरणे याबाबत**

संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना प्रकरण ७ नुसार हा कार्यक्रम ग्रामपंचायती मार्फत कार्यान्वित केला जाईल आणि या योजनेचे नियोजन आणि अंमलबजावणी यासाठी ती जबाबदार असेल तांत्रिक पर्यवेक्षण करणे ही पंचायत समिती आणि जिल्हा ग्रामविकास अभिकरण / जिल्हा परिषद जबाबदारी असते तरी लेखापरीक्षणाच्या कालावधी तांत्रिक पर्यवेक्षणाचे अहवाल अथवा सूचना पंचायतीच्या भेट पुस्तिकेत आढळून आले नाहीत.

---

**परिच्छेद क्रमांक :- १८ :- हजेरी पटाबाबत**

संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना मार्गदर्शन पुस्तिका ५ मधील नियम १६.२ नुसार कामगारांना प्रदान केलेल्या वेतनाचा तपशील दर्शविणारा प्रत्येक कामाचा स्वतंत्र हजेरीपट ठेवण्यात यावा सर्व कामाच्या हजेरी पटामध्ये अनुसुचित जामी / जमाती /

महिला आणि नोकरीत असणा-या इतरांची संख्या तपशील दर्शविणा-या नोंदी लेखापरीक्षणाच्या तपासणीत आढळून आल्या नाहीत.

हजेरी पटातील पृष्ठांना क्रमांक देण्यात आलेले नाहीत तसेच सरपांने प्रमाणित केलेले नाहीत. याबाबत खुलासा करावा.

---

**परिच्छेद क्रमांक :- १९ :- बँकेत खाते उघडण्याबाबत**

संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना मार्गदर्शन पुस्तिका प्रकरण ५ मधील नियम १२ अन्वये सदर योजनेचे खाते राष्ट्रीयकृत बँक व पोष्ट यांच्या बचत खातयात उघडण्याचे आवश्यक असतांना पंचायतीने सदरचे चालु खाते उघडल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे शिल्लक रक्कमेच्या मिळणा-या व्याजापासून ग्रामपंचायतीस व्याजास मुकावे लागले आहे. याबाबत खुलासा करावा.

---

**परिच्छेद क्रमांक :- २० :- अनुसूचित जाती / जमाती यांच्यासाठी खर्च करावयाच्या अनुदानाबाबत**

संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना मार्गदर्शक पुस्तिकामधील प्रकरण १ मधील १.५ (खख) अन्वये ग्रामीण भागाती अनुसुचित जाती / जमाती करिता कमीत कमी ५०% (धान्यासह मिळणारे एकूण अनुदानाच्या) अनुदानाचा वापर करणे आवश्यक आहे.

तथापि ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रातील एकूण अनुसुचित जाती / जमातींची संख्या / टक्केवारी तसेच त्यांचे प्रभाग क्रमांक याबाबतचे स्वतंत्र असे कोणतेही कागदपत्र दप्तरी उपलब्ध नसल्याने वरीलप्रमाणे अनुदानाचा वापर करण्यात आला किंवा नाही याची खात्री लेखापरीक्षणात करता येत नाही. याबाबत पंचायतीने आवश्यक ती सर्व कागदपत्रे उपलब्ध करुन अनुदानाच्या खर्चाची खात्री पटवावी. तसेच आता अनुसुचित जाती / जमाती यांचे साठी विहित मर्यादेपेक्षा कमी खर्च येत असल्यास तो पुढील वर्षात करणेत यावे व यापुढे शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याची दक्षता घ्यावी.

---

**परिच्छेद क्रमांक :- २१ :- मजूरीतील स्त्रियांच्या सहभागाबाबत**

संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना मार्गदर्शक पुस्तिका मधील प्रकरण १ मधील १.५ (३) अन्वये स्त्रियांसाठी ३०% रोजगार उपलब्ध करणेबाबतच्या सुचना असतांना

पंचायतीने तसे केल्याबाबतचे वर्षाचे शेवटी हजेरी पटावर ३०% महिलांचा सहभाग असल्याबाबतच्या नोंदी नाहीत. तसेच हजेरी पट तपासतांना स्त्रियांचा सहभाग कमी असल्याचे दिसून येते. याबाबत खुलासा करुन यापुढे शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याची दक्षता घ्यावी.

---

**परिच्छेद क्रमांक :- २२ :- धान्य वाटपाबाबत**

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक संग्रारोयो/२००१/प्र.क्र.२४३/जल-१६, मंत्रालय, मुंबई दिनांक ८.२.२००२ अन्वये संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेतंर्गत धान्य वाटप अनिवार्य व बंधनकारक आहे. तसेच विहीत प्रमाणात धान्या वाटप न झाल्यास त्या ग्रामपंचायतीचा त्याप्रमाणात निधीचा वाटा कमी होणार आहे.

---

**परिच्छेद क्रमांक :- २३ :- जवाहर ग्राम समृध्दी योजना खाते बंद करण्याबाबत**

दिनांक २५.९.२००१ पासून जवाहर ग्राम समृध्दी योजना बंद होऊन संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना अस्तित्वात आलेली आहे. तथापि जवाहर ग्रामसमृध्दी योजना खाती शिल्लक असलेल्या रक्कमा पंचायत समितीमार्फत शासनाकडे परत करणे आवश्यक असतांना पंचायतीने खाते बंद केलेले नाहीत. रक्कम रुपये ४,५२,४५१/- शिल्लक असल्याने पंचायत समितीकडे परत करण्यात यावी.

---

**परिच्छेद क्रमांक :- २४ :- कामाची तपासणी व दक्षता प्रणालीबाबत**

संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना मार्गदर्शक पुस्तिका प्रकरण ७ मधील नियम क्रमांक १.२ अन्वये तसेच महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक सं.ग्रा.रो.यो./२००१/प्र.क्र.२४३/जल-१६, मंत्रालय, मुंबई दिनांक ८.२.२००२ अन्वये नमुद केल्याप्रमाणे तांत्रिक तपासणी जिल्हा स्तरावरील अधिका-यांनी करणे सक्तीचे व अनिवार्य असून त्यासाठी रोजगार हमी योजनेखालील तांत्रिक तपासणी नमुना वापरण्यात यावा असे नमुद असतांना, पंचायतीचे दप्तरी संबंधित अधिका-याच्या भेटी संदर्भात शेरे बुकात नोंदी आढळून आल्या नाहीत व प्रशासकीय तपासणी नमुना पहावयास मिळाला नाही.

---

**परिच्छेद क्रमांक :- २५ :- वार्षिक कृती आराखडयाबाबत**

संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना मार्गदर्शक पुस्तिका प्रकरण ६ नियम क्र. १.१ नुसार पंचायतीने मागील वर्षाच्या तरतुदीच्या १२५% रक्कमेपर्यंत धान्य वाटप विचारात घेऊन ग्रामसभेच्या मंजूरीने प्राधान्य क्रमाने कामे सूचविणे आवश्यक आहे. सूचविलेली कामे शक्यतो एक वर्षाच्या अनुदानातून पूर्ण करावी असे अपेक्षित आहेत. तसेच सदर आराखडा मंजूर करण्याचा अधिकार सभेस आहे. सुचविलेल्या सर्व कामांचा आराखडा फेब्रुवारी अखेरपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे, असे असतांना निर्णयाची काटेकोरपणे अंमलबजावणी केल्याचे दिसून येत नाही. यापुढे शासन निर्णयाची अंमलबजावणी करतांना पंचायतीने काळजी घ्यावी. पंचायतीने कामे मंजूर करतांना उपलब्ध तरतुदीच्या ५०% अनुदानातून अनुसूचित जाती व जमातीच्या वस्त्यांमध्ये मुलभूत सुविधांची कामे घणे व उर्वरित ५०% अनुदानातून जलसंधारणाची कामे आदर्श पाणलोट विकास आराखडयानुसार प्रस्तावित करणे आवश्यक असतांना, त्यानुसार कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. यापुढे पंचायतीने शासन निर्णयानुसार अंमलबजावणी करण्याची दक्षता घ्यावी.

---

**परिच्छेद क्रमांक :- २६ :- हजेरी पत्रकातील अनिमितता**

लेखापरीक्षण कालावधीतील हजेरी पत्रकातील पडताळणी करता त्यामध्ये खालीलप्रमाणे अनियमितता आढळून आल्यात.

मुंबई ग्रामपंचायत (अंदाजपत्रक व हिशोब) नियम १९५९ चे कलम ५(१) अन्वये तसेच संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना प्रकरण ५ मधील १६.२ अन्वये ग्रामपंचायतीचे हिशोब विहीत नमुन्यात व अद्यावत ठेवणेची जबाबदारी ग्रामसेवक यांची असतांना हजेरीपत्रकातील नोंदी अद्यावत का करणे आल्या नाहीत याबाबत खुलासा करावा व सर्व नोंदी अद्यावत करुन पुर्तता सादर करावी.

१. कामावर असलेल्या मजूरांचे दैनंदिन हजेरीपत्रक ठेवण्यात आलेले नाही. त्यामुळे एकाच मजूराचे एकाच दिवशी वेगवेगळ्या कामावर हजर असण्याची शक्यता नाकारता येत नाही.
२. हजेरी पटावर हजेरीपट सुरु झाल्याचा व संपल्याचा दिनांक नमुद नाही.
३. हजेरी पटावर मजूरांचे पत्ते, हुद्दा, द्रारिद्रय रेषा कार्ड क्रमांक, अनुसूचित जाती जमाती इत्यादींबाबत माहिती नमुद नाही.

४. हजेरी पटावर दोन साक्षीदारांच्या सह्या नाहीत, सरपंच यांच्या सह्या नाहीत, तसेच मजूरांचे अंगठे प्रमाणित केलेले नाहीत. त्यामुळे त्याच मजूरांचे असल्याची खात्री करता आली नाही.
५. हजेरी पटावर कामाची मोजमापे, मुल्यांकन, मजूरांचे दर नमुदकरुन ते तांत्रिक अधिकारी यांनी प्रमाणित केलेले नाहीत.
६. हजेरी पत्रकातील सर्व रकाने भरलेले नाहीत.
७. हजेरी पत्रकाचा भाग क कामाचे मोजमापानुसार गोषवारा भरलेला नाही, तो भरुन कनिष्ठ अभियंता यांचेकडून प्रमाणित करुन घेण्यात यावा.
८. हजेरी पत्रकावर अनुसूचित जाती / जमाती स्त्रियांची वर्गवारी काढण्यात आलेली नाही.
९. हजेरी पटावर बैलगाडीने, टॅक्टरने वाळू, खडी, दगड वाहतूक दाखविली जाते, परंतु नंबर १८ मध्ये परिणाम दिलेले नाही. तसेच गवंडीचे काम नमुद केले आहे. त्या कालावधीत कोणते काम व किती केले ते नमुद नसल्याने प्रदान केलेली रक्कम कामाच्या प्रमाणात योग्य अदा झाल्याची खात्री करता येत नाही.

---

**परिच्छेद क्रमांक :- २७ :- नमुना नंबर १८ - साठा नोंदवहीबाबत**

ग्रामपंचायतीने लेखापरीक्षण कालावधीकरीता ठेवलेल्या नमुना नंबर १८ - साठा नोंदवहीत खालीलप्रमाणे अनियमितता दिसून आल्यात.

१. नमुना नंबर १८ मध्ये पंचायतीने वेळोवेळी खरेदी केलेले सिमेंट, विटा, दगड, गटारी, पाइप, लोखंड, दरवाजे, खिडक्या, फरशी, खडी इ. च्या जमेच्या नोंदी केलेल्या आहेत. सदर नोंदी ह्या कामनिहाय घेण्यात आलेल्या नाहीत.
२. साहित्य जमेच्या नोंदी केल्यावर सदरचे साहित्य खर्च केलेल्या नोंदी तारखेनुसार व परिमाणानुसार कामनिहाय खर्चाच्या नोंदी केलेल्या नाहीत. खर्चाच्या नोंदी नसल्याने खरेदी केलेले सर्व साहित्य शिल्लक दिसते. खर्चाच्या नोंदी न करण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे.
३. खर्चाच्या नोंदीवर वस्तु देणा-या व घेणा-याच्या स्वाक्ष-या नाहीत.
४. सिमेंट, विटा, दगड इत्यादी साहित्य खरेदीच्या नोंदी तारखेनुसार केलेल्या आहेत, परंतु सदरचे सिमेंट, विटा, दगड इत्यादी कोणत्या कामासाठी, कोणत्या दिवशी, किती दिल्यात याच्या नोंदी केलेल्या नाहीत. कामनिहाय साहित्य किती खर्ची पडले ते काढता येत नाही. सदरच्या साहित्याचा विनियोग दाखवलेला नसल्याने कोणत्या कामावर किती साहित्य वापरले व किती शिल्लक राहिले याची पडताळणी करता आली नाही. त्यामुळे पंचायतीने आवश्यकतेपेक्षा जास्त साहित्य खरेदी केले किंवा कसे? याची पंचायत समिती स्तरावरुन खात्री व्हावी व यापुढे संबंधित सचिव यांनी

नमुना नंबर १८ ला नोंदी घेतांना काळजी घेऊन विहीत नमुन्यात अचुक व पूर्ण भरावी.

---

**परिच्छेद क्रमांक :- २८ :- प्राप्त धान्य व वाटप धान्याबाबत**

तपासणी वर्षात खालीलप्रमाणे धान्य मिळालेली व ते हजेरी पत्रकाद्वारे मजुरांना वाटप केलेली नोंद संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना निधीचे रोखवहीत आहे.

| धान्य प्रकार | किलो | दर | एकूण |
|---|---|---|---|
| गहु | - | - | ५११२.०० |
| | | | |

**अभिप्राय :-**

पंचायतीस धान्य मिळणेबाबतचे पंचायतीने पंचायत समितीत लिहिलेले पत्र पंचायतीचे पत्राचे अनुषंगाने पंचायत समितीने तहसिलदार यांना शिफारस केलेले पत्र पंचातीस धान्य मंजूर केलेबाबतचे व वितरण केलेबाबतचे तहसिलदार यांचे परमिट / आदेश इत्यादी कागदपत्र तपासणीस पहावयास मिळाले नाहीत. त्यामुळे वरीलप्रमाणे प्राप्त धान्य व वाटप धान्य बरोबर असल्याची सत्यता पटत नाही. याबाबत खुलासा करुन सदरचे कागदपत्र प्राप्त करुन वरीलप्रमाणे प्राप्त धान्य व वाटप धान्य बरोबर असल्याची सत्यता पटवावी. तो पावेतो वरीलप्रमाणे प्राप्त धान्य व वाटप धान्य बरोबर असल्याचे ग्राह्य मान्यता येत नाही. तोपर्यंत सदरचा खर्च रुपये ५,११२/- लेखापरीक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

---

**परिच्छेद क्रमांक :- २९ :- सर्वसाधारण अभिप्रायांबाबत.**

१. मुंबई ग्रामपंचायत अंदाजपत्रक व हिशोब नियम १९५८ चे नियम ५(ब) प्रमाणे रुपये ५००/- वरील रक्कमा धनादेशाद्वारे प्रदान करणे आवश्यक आहे तसे दिसून आले नाही. नियमांचे पालन करण्याची यापुढे दक्षता घेणेत यावी.

२. शासन आदेश क्र. आर.डी.डी./व्ही.क्र.२४२२/सी.आर.६ दिनांक ३१.३.१९८० अन्वये पावती पुस्तके मा. गटविकास अधिकारी यांचेकडून प्रमाणित करणे आवश्यक आहे, तसे केलेले नाहीत. तरी आता नियमांचे पालन करण्याची दक्षता घ्यावी.

३. प्रत्येक महिन्याचे शेवटी रोख पुस्तिकेतील शिल्लक व बँक पासबुकातील शिल्लकेचा मेळ घेतलेबाबतचे प्रमाणपत्र नोंदविलेले नाही.

४. कामवार जमा खर्चाचे वर्गीकरण केलेले नाही.

५. वरील उणीवा पहाता योजनेवर योग्य प्रशासकीय नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. या अहवालावर मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १४० प्रमाणे कार्यवाही करावी.

६. पंचायतीने ठेवलेले नमुना नंबर २५,२६,२७ मधील नोंदी अपूर्ण असून अहवाल वर्षात केलेल्या कामाच्या नोंदी अद्यावत ठेवलेल्या नाहीत, त्या ठेवण्यात याव्यात.

७. अहवालातील आक्षेपाबाबत मुंबई ग्रामपंचायत नियम १९६१ चे नियम २१ प्रमाणे मा. सरपंच / ग्रामसेवक यांचेशी चर्चा केली आहे.

---

**परिच्छेद क्रमांक :- ३० :- लेख्यांवरील अभिप्राय**

सदर योजनेचे लेखे तपासता त्याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

१. प्राप्त धनादेशाची नोंदवही तसेच जमा रक्कमेच्या संबंधीची समितीकडील अधिकृत कागदपत्रे (दाखले) दप्तरी नाहीत.

२. हजेरी पत्रकांची साठा नोंदवही ठेवलेली नाही, तसेच दैनंदिन हजेरीपत्रक ठेवलेले नाही व ते अनुक्रमवार ठेवलेले नाहीत.

३. स्वत:चे नावे काढलेल्या धनादेशासंबंधी किरकोळ रोख पुस्तिका (नमुना नंबर २१) ठेवलेली नाही.

४. बांधकामाची प्रगती दर्शविणारी नोंदवही ठेवलेली नाही.

५. बांधकाम मोजमाप पुस्तिकांची साठा नोंदवही ठेवलेली नाही.

६. रस्ते बांधकाम नोंदवही ठेवलेली नाही.

७. योजना राबविण्याकरिता मिळालेल्या जमिनीची नोंदवही ठेवलेली नाही.

८. अनुदानाची व देणगीची नोंदवही ठेवलेली नाही.

९. अनामत व अग्रिम नोंदवही ठेवलेली नाही

१०. पूर्ण व अपूर्ण कामांची यादी ठेवलेली नाही.

११. नमुना नंबर ६ जमा व खर्चाच्या वर्गीकरण नोंदवहीत खर्चाचे कामावरील वर्गीकरण अचूक केलेले नाही.

१२. योजने अंतर्गत सादर केलेली मासिक व वार्षिक विवरणे ठेवलेली नाहीत.

१३. पंचायतीने ठेवलेल्या नमुना नंबर २५,२६,२७ मधील नोंदी अपूर्ण असून अहवाल वर्षात योजने अंतर्गत पंचायतीने केलेल्या कामांच्या नोंदी अद्यावत घेतलेल्या नाहीत, तरी सदरच्या सर्व नोंदी घेऊन नोंदवही अद्यावत करावी.

१४. प्रत्येक महिन्याच्या शेवटी रोख पुस्तकातील शिल्लक व बँक पासबुकातील शिल्लक यांचा मेळ घेतलेबाबत प्रमाणपत्र नोंदवलेले नाही.

१५. ग्रामसभेत खर्च मंजूर करतांना सविस्तर खर्च, प्रमाणक क्रमांक, दिनांक, रक्कम असा तपशिलानिशी खर्च मंजूर केला जात नाही. मोघम स्वरुपाची खर्चास मंजूरी घेतली जाते.

या अहवालासोबत खालीलप्रमाणे सहपत्रे जोडली आहेत.

१. पंचायतीस प्राप्त अनुदान रक्कमांचा तपशील

२. वार्षिक जमा खर्चाचा तक्ता नमुना फ

३. बांधकामाचे विवरण नमुना ग

या अहवालावर मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १४० प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

(शे. गो. देवळे)
जिल्हा ग्रामपंचायत लेखा परीक्षक, श्रेणी – २,
स्थानिक निधी लेखा, नाशिक

प्रत : माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सविनय सादर :-

१. मा. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद, नाशिक

२. मा. गटविकास अधिकारी, पंचायत समिती - चांदवड, जिल्हा - नाशिक

निर्गमित

(शे. गो. देवळे)
जिल्हा ग्रामपंचायत लेखा परीक्षक, श्रेणी – २,
स्थानिक निधी लेखा, नाशिक

# महाराष्ट्र बँक खाते क्रमांक - ५३३५

## प्राप्त अनुदान

| दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|
| सन २००५ - २००६ | |
| ९.५.२००५ | ५०,१३१ |
| २३.६.२००५ | १,००,००० |
| २७.६.२००५ | १,००,००० |
| १.७.२००५ | ५०,००० |
| ४.७.२००५ | १,५०,००० |
| ८.७.२००५ | २,००,००० |
| १०.३.२००६ | २,००,००० |
| **एकूण** | **८,५०,१३१** |
| सन २००६ - २००७ | |
| ५.६.२००६ | ४३,३२० |
| ५.६.२००६ | ३,००,००० |
| २२.६.२००६ | २,००,००० |
| ३१.८.२००६ | २,००,००० |
| **एकूण** | **७,४३,३२०** |
| सन २००७-२००८ | |
| ४.४.२००७ | ५०,००० |
| ४.८.२००७ | ३,१३,२७२ |
| २१.१०.२००७ | १६,००० |
| **एकूण** | **३,७९,२७२** |

# <u>जमा खर्च</u>

| जमा बाब | ०५ - ०६ | ०६ - ०७ | ०७ - ०८ | खर्च बाब | ०५ - ०६ | ०६ - ०७ | ०७ - ०८ (२७.१०.०७ अखेर) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अनुदान | ८,५०,१३१ | ७,४३,३२० | ३,७९,२७२ | खर्च | ७,०५,६७२ | ९,१५,००० | ३,८०,९७३ |
| व्याज | १,०२६ | ४५१ | २४७ | | | | |
| एकूण | ८,५१,१५७ | ७,४३,७७१ | ३,७९,५१९ | एकूण खर्च | ७,०५,६७२ | ९,१५,००० | ३,८०,९७३ |
| सुरुवातीची शिल्लक | ३१,६५९ | १,७७,१०४ | ५,९२५ | अखेर शिल्लक | १,७७,१०४ | ५,९१५ | ४,४६१ |
| **एकूण** | **८,८२,८१६** | **९,२०,९१५** | **३,८५,४३४** | **एकूण** | **८,८२,८१६** | **९,२०,९१५** | **३,८५,४३४** |

# विवरणपत्र क्रमांक - १

**ग्रामपंचायत - चांदवड    तालुका - चांदवड    जिल्हा - नाशिक**

**संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना - प्राप्त अनुदान रक्कमांचा तपशिल**
**दिनांक १.११.२००७ ते ३१.३.२००८**

| वर्षे | पावती क्रमांक | दिनांक | रक्कम रुपये | अनुदानाचा तपशिल |
|---|---|---|---|---|
| ०७ - ०८ | - | २४.१.२००८ | ७६,७४० | अनुदान |
| | | ५.३.२००८ | १,८०,००० | अनुदान |
| | | **एकूण** | **२,५६,७४०** | |
| | | २६.२.२००८ | ३६० | धान्य कुपन |
| | | १७.३.२००८ | २,३७६ | धान्य कुपन |
| | | २८.३.२००८ | २,३७६ | धान्य कुपन |
| | | **एकूण** | **५,११२** | |

## नमुना ब

**ग्रामपंचायत - चांदवड    तालुका - चांदवड    जिल्हा - नाशिक**

**संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना जमा खर्च तक्ता सन २००७ - २००८**
**कालावधी (१.११.२००७ ते ३१.३.२००८)**

| जमा बाब | सन २००७ - ०८ | खर्च बाब | सन २००७ -०८ |
|---|---|---|---|
| अनुदान | २,५६,७४०.०० | गटार बांधकाम | २,६६,४५२.०० |
| धान्य कुपन | ५,११२.०० | | |
| एकूण जमा | २,६१,८५२.०० | एकूण खर्च | २,६६,४५२.०० |
| सुरुवातीची शिल्लक | ४,६६३.५१ | अखेर शिल्लक | ६३.५१ |
| **एकूण** | **२,६६,५१३.५१** | **एकूण** | **२,६६,५१३.५१** |

(सुरुवातीची शिल्लक व अखेर शिल्लकेत महाराष्ट्र बँक शिल्लकेचा समावेश नाही)

# <u>नमुना क</u>

## ग्रामपंचायत - चांदवड तालुका - चांदवड येथील संपूर्ण ग्रामीण रोजगार योजने अंतर्गत झालेल्या बांधकामाचे विवरणपत्र सन २०७ - २००८

| अ. क्र. | बांधकामाचे नाव | प्रशासकीय मंजूरीचा ठराव क्र. व दि. | तांत्रिक मंजूरीचे पत्र क्र. व दि. | प्राकलित मुल्य | वर्षात प्रत्यक्ष झालेला खर्च | क. अभियंता ता. अधिकारी यांनी केलेल्या मोजमापाप्रमाणे अंतिम मुल्यांकन | मजुरांचे मजुरीवरील खर्च | | साहित्य खरेदीवर झालेला खर्च | मजूरी व साहित्य खरेदी यावर झालेल्या खर्चाची टक्केवारी | | प्राकलनाप्रमाणे अपेक्षित मानवी दिवस | प्रत्यक्ष निर्माण झालेले मानवी दिवस | कामाची टक्केवारी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | रोख | धान्य | | मजूरी | साहित्य | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | |
| १ | गटार बांधकाम | - | ११४५ / २४.१२.०७ | ३१३५०० | २६६४५२ | ३१२८८९ | ३९११९ | ५११२ | २२२२२१ | ३० | ७० | - | - | - | पूर्ण |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |